# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.10.2024** **वार – बुधवार**

---

**<u>डेंग्यूची लस</u>**

डेंग्यू या विषाणुजन्य आजारावरील लस भारतात तयार करण्यात असून लसीच्या अंतिम टप्प्यातील चाचण्या पुण्यात पार पडणार आहेत. पुण्यातील राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था आणि नॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ ट्रान्सलेशनल व्हायरोलॉजी अँड एड्स रिसर्च या दोन्ही संस्था यासाठी पुढाकार घेणार आहेत. डेंग्यूचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी लसीची निर्मिती करण्यात आली असून, लस विकसित होण्यातील महत्त्वाचे टप्पे शहरात पार पडणार आहेत. डेंग्यूच्या चारही प्रकारांवर प्रभावी ठरेल, अशी लस विकसित झाल्यास, लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत दिलासा मिळू शकणार आहे.

**<u>सदिच्छादूत नियुक्ती</u>**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्येम मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, मतदानाची टक्केवारी वाढावी, या उद्देशाने मतदारांना आवाहन करण्यासाठी पर्वती विधानसभा मतदार संघाअंतर्गत सदिच्छादूत म्हणून कवी, गायक संदिप खरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर दिव्यांग मतदारांना मताधिकार बजावण्यासाठी प्रोत्साहित करण्याकरीता प्रसिद्ध दृष्टिहीन कलाकार प्रवीण रमेश पाखरे यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती मतदारसंघाचे निर्णय अधिकारी मनोजकुमार खैरनार यांनी दिली आहे. 40 टक्केपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या दिव्यांग मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी निवडणूक प्रशासन विशेष प्रयत्न करीत आहे, असेही खैरनार यांनी सांगितले.

**<u>मतदान जनजागृती</u>**

पिंपरी चिंचवड विधानसभा कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी व्यापक प्रमाणात मतदान जनजागृती करण्यात येत आहे. या अंतर्गत आज दीव्यांग बांधवांना मतदानाचा हक्क बजावण्याचे शपथ देण्यात आली. शहरात दिव्यांग मतदारांची संख्या 4,342 असून त्यांचकरिता मतदान केद्रांवर रॅम्प, व्हीलचेअर, मदतनीस, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, याशिवाय दिव्यांग

मतदारांना मतदान केंद्रावर जण्या येण्यासाठी मुख्य चौकात, रिक्षाची सुविधा देण्यात येणार असून त्यामुळे कार्यक्षेत्रातील दिव्यांग मतदारांना मतदान करणे सोयीस्कर होणार आहे.

आज यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला, वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी रुग्णसेवा करण्याबरोबरच मतदान करण्याचे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडून लोकशाही सक्षम करण्यासाठी सहकार्य करावे असे प्रतिपादन रुग्णालयाचे अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांनी केले.

**<u>बनावट फळपीक विमा</u>**

शेतात जागेवर फळबाग नसताना बनावट फळपीक विमा उतरविल्याचे बहुतांश जिल्ह्यात उघड झाले आहे. त्यापार्श्वभूमीवर राज्यात फळबाग विमा तपासणीचे आदेश पुणे कृषी आयुक्तालयाने दिले आहेत. कृषी आयुक्तालयाच्या तपासणी पथकाने केलेल्या 363 फळबागांच्या तपासण्यांमध्ये 137 ठिकाणी फळबाग लागवड आढळली नाही. तर 55 ठिकाणी लागवडीपेक्षा अधिक क्षेत्रावर फळपीक विमा उतरविला आहे. 18 ठिकाणी उत्पादनक्षम बाग नसतानाही, विमा उतरविण्यात आला आहे. बनावट पीक उतरविणे हा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा आहे. त्यामुळे ज्यांनी बनावट पीक विमा उतरविल्याचे स्पष्ट झाले आहे, त्यांनी आपापले पीक विम्याचे अर्ज तत्काळ मागे घ्यावे असे आवाहन कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी केले आहे.

**<u>प्रतापगडाची प्रतिकृती</u>**

रमणबाग युवा मंच आणि गोष्ट इथे संपत नाही, यांच्या वतीने दिवाळीनिमित्त समरभूमी-प्रतापगड हा प्रतापगडाची प्रतिकृती असणारा 20 मिनिटांचा दृक्-श्राव्य कार्यक्रम सादर करण्यात येत आहे. आजपासून येत्या सोमवार पर्यंत संध्याकाळी 4 ते 10 वेळात रमणबाग प्रशालेच्या फरसबंद मैदानात सर्वांसाठी विनामूल्य प्रवेश असणारा हा उपक्रम होणार आहे.

**<u>दिवाळी पहाट</u>**

दिवाळीच्या प्रकाशपर्वाचे निमित्त साधून संत मुक्ताबाई यांचे चरित्र उलगडून दाखविणाऱ्या 'ब्रह्मचित्कला मुक्ताई' या आगळ्या वेगळ्या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. शुभारंभाचा प्रयोग दिवाळी पाडव्याला अर्थात शनिवार, 2 नोव्हेंबर रोजी सकाळी 7 वाजता सदाशिव पेठेतील रेणुका स्वरूप शाळेशेजारील भावे प्राथमिक शाळेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. कीर्तनाच्या धाटणीतून संतांचा जीवनपट उलगडून काही संत रचना तर काही भक्तीगीते या कार्यक्रमात सादर केली जाणार आहेत.

**<u>आंतरक्लब क्रिकेट</u>**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने 12 वर्षाखालील मुलांच्या एस ए-आर के अजिंक्यपद करंडक आंतरक्लब क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. या स्पर्धेत मुलींच्या गटात, एस ए आर के क्रिकेट अ‍ॅकॅडमीने क्रिकेट नेक्स्ट अ‍ॅकॅडमीचा 57 धावांनी पराभव केला. तर मुलांच्या गटात वैभव क्रिकेट अ‍ॅकॅडमीने करण क्रिकेट अ‍ॅकॅडमीचा 8 गडी राखून पराभव केला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज हवामान कोरडं होतं. उद्याही हवामान कोरडं राहून कमाल तापमान 34 अंशांच्या आसपास राहील, सकाळी धुके पडण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारतीपुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे  वृत्तांतमध्ये, नमस्कार.**